# प्रकरण १ ले

## प्रास्ताविक

# प्रकरण १ ले

## प्रास्ताविक

१·१ विषय प्रवेश

१·२ संशोधन समस्येचे शब्दांकन

१·३ संशोधन विषयाचे स्वरूप महत्व आणि व्याप्ती·

१·४ संशोधनाची उद्दिष्टे

१·५ गृहित गोष्टी

१·६ संशोधनाच्या मर्यादा

१·७ संशोधनाची पद्दती

१·८ प्रकरणीकरण

=0=0=0=0=0=

# प्रकरण १ ले

## प्रास्ताविक

### १·१ विषय प्रवेश :

आजच्या सामाजिक परिस्थितीचे अवलोकन केले तर समाजामध्ये सर्वच क्षेत्रांत वाढत चाललेला भ्रष्टाचार, वशिलेबाजी आढळून येत आहे· तसेच आर्थिक, नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी मूल्यांचा -हास होत असल्याचे दिसून येत आहे· दिवसेंदिवस ही परिस्थिती अधिकच रौद्र रूप धारण करत आहे· त्यामुळे समाजजीवनात विफलता, नैराश्य आले आहे· ही परिस्थिती बदलण्यासाठी समाजामध्ये मूल्यसंवर्धनाची नितांत गरज भासत आहे·

मूल्यसंवर्धन हे नैतिक व आध्यात्मिक प्रवृत्तीच्या विकासाहून वेगळे नाही· सॉक्रेटीसने "Knowledge is virtue" "ज्ञान म्हणजेच सद्‌गुण" असे म्हटले होते· याचे प्रत्यंतर आपल्या प्राचीन काळच्या शिक्षणविषयक कल्पनामध्येही दिसून येते· ज्ञानापेक्षा सद्‌गुणांवर, सदाचारावर, नैतिक वागणुकीवर अधिक भर होता, म्हणूनच " शीलं परं भूषणम् " । हा वागणुकीचा आदर्श होता· महाभारतात सुध्दा धर्माप्रमाणे आचरण करणारा, शुध्दाचरणी व चारित्र्यसंपन्न माणूस खरा ज्ञानी होय असे सांगते· या सर्वांवरून " मूल्यांचे संस्कार करून चारित्र्य घडविणे "[१] हे शिक्षणाचे महत्वाचे उद्दिष्ट ठरते·

भारत देश १५ ऑगस्ट, १९४७ साली स्वतंत्र झाला· २६ जानेवारी, १९५० मध्ये राज्यघटना अंमलात येऊन लोकशाही प्रजातंत्रशासन प्रणालीचा स्वीकार केला गेला आणि भारत हे एक " सेक्युलर राष्ट्र " म्हणून जाहीर करण्यात आले·

भारतासारख्या खंडप्राय देशात विविध धर्मांचे लोक राहतात. त्यांना कोणत्या धर्मांचे, धार्मिक मूल्यांचे शिक्षण द्यावयाचे असा प्रश्न निर्माण होतो. प्रत्येक धर्माच्या मूळ तत्वज्ञानात फरक नसला तरी धर्म शब्दात त्याचा प्रेषित, त्याची भाषा, जीवनातील घटना, धर्माकरिता सांगितलेले कर्मकांड या सर्वांचा समावेश होतो. यात समानता नाही. त्यातील भिन्नता हीच त्या त्या धर्मांचे अनुयायी धर्म मानू लागले. या वस्तुस्थितीमुळे धर्म, धार्मिक शिक्षण इत्यादी शब्दांचा त्याग करावा लागत आहे.

वरील वस्तुस्थितीमुळेच भारत हे " सेक्युलर राष्ट्र " असे घोषित करण्यात आले. " सेक्युलर " शब्दाकरिता धर्मनिरपेक्षता, निधर्मी, धर्मातीतता, सर्वधर्मसमभाव असे विविध शब्द उपयोगात आणले जात आहेत. या शब्दांमुळेही लोकमतात पुष्कळ गोंधळ निर्माण केला आहे. या गोंधळामुळेही धर्म शब्दाचा त्याग करावा लागत आहे.

वरील परिस्थितीचा परिणाम म्हणून भारतीय राज्यघटनेत शासकीय व शासन अनुदानित शिक्षणसंस्थामध्ये धार्मिक शिक्षण देण्याबाबत घातलेल्या बंधनामुळे नीतिमूल्य बीजारोपण व संवर्धन सर्व धर्मातील उच्च मौलिक तत्वांचा उपयोग व त्यांचे संस्कार करता येईनासे झाले आहेत. धर्म या माध्यमाद्वारे नीतिमूल्य-संवर्धनाचे कार्य, तत्वांचे आचरण आज त्याज्या ठरले आहे. या साठी "विद्यापीठ शिक्षण आयोग" (१९४८-४९) नी केलेले विधान अत्यंत महत्वपूर्ण वाटते.

"... To be secular does not mean to be religiously illiterate. It is to be deeply spiritual and not narrowly religious."[2]

यामुळे धर्म या संकल्पनेचा पुनर्विचार आवश्यक आहे. धर्म ही संकल्पनाच मुळी समाजात सर्वांनी सर्वांशी आपुलकीने वागावे हे सांगण्यासाठी जन्माला आलेली आहे. म्हणून जो समाजधारणा करतो तो धर्म असे म्हटले जाते. परंतु हा विचार लोप पावत चालला आहे.

वरील धर्मभावनेतील मूलभूत विचार आणि चारित्र्य संवर्धनाच्या अभावामुळे समाजामध्ये वाढलेल्या विघातक प्रवृत्तीचे दर्शन फक्त सर्वसामान्य स्तरावरच होते आहे असे नाही. तर उच्च विद्याविभूषित व्यक्ती शिक्षित आहे म्हणून सुसंस्कारी, उच्च ध्येये, मूल्यांचे संगोपन, संवर्धन करणारी, ती जोपासणारी असेलच याची खात्री देता येत नाही. कारण अशा उच्च विद्याविभूषित व्यक्तीसुध्दा विविध जीवनमूल्यांना गुंडाळून ठेवून, नैतिक मूल्यांना पायदळी तुडवून जीवन कंठित असलेले दिसून येतात. ज्यांनी समाजाला मार्गदर्शन करावयाचे, ज्यांचा आदर्श इतरांनी घ्यावयाचा असे आदर्श व्यक्तिमत्व समाजात दुर्मिळ झाले आहे. त्याचा परिणाम म्हणून समाजातील सर्वच स्तरावर विविध जीवनमूल्यांचा वाढता ऱ्हास, सर्वत्र ढासळणारी जीवनमूल्ये व यातून जीवनास आलेले व्यापारी, भ्रष्टाचारी स्वरूप यांचे अनिष्ट परिणाम नित्य ऐकावयास, वाचावयास, पहावयास मिळतात. त्यामुळे सुखी, समृध्द, संपन्न, जीवनासाठी सुसंस्कारी, चारित्र्यसंपन्न, आदर्श व्यक्तिमत्व निर्माण करून योग्य जीवनमूल्यांची जोपासना करणारी चारित्र्यसंपन्न पिढी निर्माण करणे अगत्याचे आहे.

शिक्षण आयोग (१९६४-६६) या शिक्षण आयोगाने " नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचा विकास " हे राष्ट्रीय उद्दिष्ट मानले आहे.[३] या दृष्टीने विद्यार्थ्यांत सत्प्रवृत्ती, सद्विचार व सद्भावनांचे प्रवर्तन करणे, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करणे, त्यांचे चारित्र्य घडविणे हे शिक्षणाचे सर्वश्रेष्ठ कार्य म्हणावे लागेल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ " शैक्षणिक कार्यक्रमाकडून कृती कार्यक्रमाकडे " यामध्ये खालील प्रमाणे विचार उद्धृत केलेले आहेत.

" आवश्यक मूल्यांच्या ऱ्हासाबाबत वाढती चिंता आणि समाजातील वाढत जाणारी उपहास वृत्ती यामुळे सामाजिक आणि नैतिक मूल्ये रुजवण्यास शिक्षण हे समर्थ साधन बनावे यासाठी अभ्यासक्रमाची पुन्हा नव्याने जुळणी करण्याची

करण्याची गरज निर्माण झाली आहे.

आपल्या सांस्कृतिकदृष्टया बहुविध असणा-या समाजात, सर्वसामान्य जनतेत ऐक्य व पूर्णत्व येण्यासाठी शिक्षणाने वैश्विक व शाश्वत मूल्यांना उत्तेजन दिले पाहिजे. अशा मूल्यशिक्षणाने गूढवाद, धर्मवेड, हिंसा, लोकभ्रम, दैववाद कमी करण्यास मदत केली पाहिजे." [४]

वरील उता-यावरुन शिक्षण हे मूल्यसंवर्धनाचे प्रमुख साधन आहे हे लक्षात येते. परंतु मूल्यांचे शिक्षण दिल्याने अथवा अध्यापनाद्वारे केवळ मुलांना सांगण्याने ती त्यांच्यामध्ये विकसित होतीलच असे नाही. केवळ माहिती किंवा ज्ञान संक्रमित करण्यापेक्षा अध्यापनाद्वारे विद्यार्थ्यांच्या विविध मानसिक शक्ती व प्रवृत्तींना योग्य वळण लावून त्यांच्यामध्ये मूल्ये कशी रुजतील याची काळजी घेणे अगत्याचे आहे. थोडक्यात हे रोपणाचे कार्य आहे व ते शिक्षण - प्रक्रियेद्वाराच व्यवस्थित होऊ शकेल. कारण मूल्यांचे विकसित रुप आपण त्या व्यक्तीच्या वर्तनात पाहतो. त्यामुळे शिक्षण हे मूल्यसंस्काराच्या संदर्भात अत्यंत प्रभावी साधन आहे.

मूल्य संस्काराच्या संदर्भात विविध शिक्षणतज्ञांनी आपले विचार मांडलेले आहेत. या संदर्भात " शिपमन " यांची शिक्षणाची व्याख्या पाहणे इष्ट ठरेल.

" जेणे करुन व्यक्तीच्या वर्तनात बदल घडवून आणून तद्द्वारा एकंदर समाजामध्येही बदल घडून येईल या हेतूने जाणीवपूर्वक नियंत्रित केलेली प्रक्रिया म्हणजे शिक्षण." [५]

शिक्षणाच्या संदर्भात " कॉमीनियस " या शिक्षणतज्ञानेही व थोडयाफार फरकाने वरील विचारच उद्धृत केलेले आहेत. त्याने शाळेसंबंधी विचार व्यक्त करताना म्हटले आहे, " खरी शाळा म्हणजे माणुसकीचा कारखाना असतो." [६]

शिक्षणतज्ञांच्या वरील व्याख्यावरुन मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी शिक्षण हे कसे प्रभावी साधन आहे हे लक्षात येईल. यासाठी अध्यापनाद्वारे मातृभाषा या विषयाच्या माध्यमातून जाणीवपूर्वक मूल्यांची जोपासना करणे अगत्याचे आहे. म्हणून सुयोग्य मूल्य संस्कारासाठी आपण शिक्षणाद्वारेच पध्दतशीर संस्कार करून व्यक्तीमध्ये त्यांचे संवर्धन करु शकतो.

मातृभाषा मराठीच्या अध्यापनाची अनेक उद्दिष्टे आहेत. त्यामध्ये व्यक्तिमत्वाच्या व्यापक विकासासंबंधी व ध्येय, मूल्य व दृष्टिकोन यासंबंधी अनेकांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. के.प्राचार्य ग.वि.अकोलकर यांनी " मराठीचे अध्यापन " या आपल्या पुस्तकात या संदर्भातच विचार मांडलेले आहेत.[७]

तसेच प्रा. म.बा. कुंडले यांनीही मातृभाषेच्या उद्दिष्टांचा विचार करतांना " मराठीचे अध्यापन " या आपल्या पुस्तकात " मूल्य संवर्धन " , " चारित्र्य संवर्धन " या संदर्भात विचार मांडले आहेत.[८]

वरील प्रमाणेच प्राचार्या लीला पाटील यांनीही आपल्या " मराठीचे अध्यापन व मूल्यमापन " या पुस्तकात " व्यक्तिमत्व विकास " हा स्वतंत्र उपविभाग केलेला आहे. यामध्ये त्यांनी " मूल्य जोपासना " व संस्कार संवर्धनाचे महत्वा यासंबंधी आपले विचार मांडले आहेत. [९]

वरील सर्व मान्यवरांच्या विचारावरुन " मूल्यांचे आरोपण करणे " हे मातृभाषेचे प्रमुख उद्दिष्ट आहे हे लक्षात येते. म्हणूनच अभ्यासक्रमात मूल्य-संवर्धनाचे संदर्भात मातृभाषेच्या अध्यापनाला महत्वाचे स्थान दिले आहे.

मातृभाषा म्हणून मराठी शिकवितांना, विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रूजवण्याचे दृष्टीने शिक्षक कांही प्रयत्न करतात कां ? तसेच मराठीच्या पाठयपुस्तकातील पाठांतून प्रतीत होणारी सर्व मूल्ये ते शोधतात का ? ही मूल्ये ठसावीत, त्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर व्हावेत म्हणून ते जाणीवपूर्वक कांही

प्रयत्न करतात का ? या संदर्भात एक शिक्षक प्रशिक्षक आणि शिक्षणशास्त्राचा एक विद्यार्थी म्हणून तसेच या विषयाचा एक शिक्षक म्हणूनही प्रस्तुत संशोधकाला या विषयातील संशोधना विषयी अभिरुची आहे.

१.२ संशोधन समस्येचे शब्दांकन :

उपरोक्त परिच्छेदांतील केलेल्या विवेचनातून संशोधन विषयाचे पुढीलप्रमाणे शब्दांकन केलेले आहे.

" प्राथमिक स्तरावरील मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सात्मक अभ्यास."

संशोधन हा एक शास्त्रीय अभ्यास आहे. शास्त्रीय अभ्यासात विविध संज्ञा एका विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात. यासाठीच वरील संशोधन समस्येच्या विधानात वापरलेल्या संज्ञांच्या पुढीलप्रमाणे व्याख्या केलेल्या आहेत.

प्राथमिक स्तर :

या संज्ञेने इयत्ता १ ली ते ४ थी या वर्गांचाच निर्देश अपेक्षित आहे. शिवाय ज्यांची मातृभाषा मराठी आहे अशा शाळांतीलच इयत्ता १ ते ४ हे वर्ग अपेक्षित आहेत.

पाठ्यपुस्तक :

" पाठ्यपुस्तक " या शब्दास " क्रमिक पुस्तक " असा पर्यायी शब्द वापरला जातो. इंग्रजी भाषेत पाठ्यपुस्तकास 'Text Book' हा शब्द वापरतात. Text Book चा अर्थ "A Book for regular study"[10] असा आहे. पाठ्यपुस्तकाची "Basic Book used in a particular Course of Study".[11] अशीही व्याख्या केली जाते.

म्हणजेच एखाद्या विशिष्ट अभ्यासक्रमाच्या अभ्यासासाठी नेमलेले मूलभूत पुस्तक होय.

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात " महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे " यांनी मराठी माध्यमाच्या इयत्ता १ ली ते ४ थी या वर्गासाठी मराठीची तयार करून नियुक्त केलेली " बालभारती " पाठयपुस्तके १ ते ४ ही पाठयपुस्तकेच अभिप्रेत आहेत.

मूल्यशिक्षण :

मूल्य शब्दाला इंग्रजीमध्ये value असा प्रतिशब्द आहे. याचा अर्थ खालील प्रमाणे आहे.

"Beliefs about what is desirable or undesirable. Values reflect the culture of society and if the individual accepts a value for him/herself it may become a goal."[12]

येथे मूल्यशिक्षण हा शब्द सुसंस्कार या शब्दाच्या अर्थाशी निगडित आहे. मानवी जीवनातील कांही गोष्टी, काही संबंध, काही विचार याना आपण मोलाचे मानतो. त्यांच्यामुळे आपले जीवन " अर्थपूर्ण " होईल अशी श्रध्दा असते. गोष्टीबद्दलच्या या " प्रियत्वा " मुळे किंवा कल्याणकारिकत्वामुळे त्या त्या गोष्टींना जीवनात " मूल्य " प्राप्त होते. अशा इष्ट, हितकर, वांछनीय म्हणून ठरविलेल्या सुसंस्कार, सद्गुणांनाच " मूल्यांचे " स्वरूप प्राप्त होते.

मूल्य म्हणजे काय ? या बाबत विस्तृत विवेचन प्रकरण दोन मध्ये केले असल्यामुळे या ठिकाणी या संज्ञेचा अधिक उहापोह केलेला नाही.

पाठयपुस्तकाचे अध्यापन करताना शिक्षक प्रत्येक पाठांमधून मूल्य संदर्भात कोणते विशिष्ट संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रूजवण्याचा प्रयत्न करतात ते प्रस्तुत शोधनिबंधात पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे.

चिकित्सात्मक अभ्यास :

चिकित्सात्मक अभ्यास म्हणजे सूक्ष्म, सांगोपांग, अभ्यास. चिकित्सात्मक अभ्यास म्हणजे असा अभ्यास की ज्या मधून काय आहे ? त्याच बरोबर प्राप्त परिस्थितीत काय केले पाहिजे ? कसे केले पाहिजे ? याचा घेतलेला शोध.

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या संदर्भात सूक्ष्म अभ्यासामध्ये इयत्ता १ ली ते ४ थी च्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून संक्रमित होणाऱ्या मूल्यांच्या संक्रमणाबाबत विचार केलेला आहे. सांगोपांग अभ्यासामध्ये मूल्य संक्रमणाबाबत शिक्षक योजत असलेले मार्ग, मूल्ये संक्रमित न होण्याची कारणे व मूल्यांच्या प्रभावी संक्रमणासाठी योजत असलेले उपाय इत्यादी बाबींचा विचार केलेला आहे.

१.३ संशोधन विषयाचे स्वरूप , महत्व आणि व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन प्रकल्पामध्ये प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या संदर्भात विचार केलेला आहे. या स्तरापासूनच खऱ्या अर्थाने जाणीवपूर्वक दिल्या जाणाऱ्या औपचारिक शिक्षणाची सुरवात होते. या स्तरामध्ये ६ ते १० या वयोगटाची मुले येतात. मानसशास्त्रीयदृष्टया हे वय अति संस्कारक्षम असते. तसेच ते संवेदनशीलही असते. त्यामुळे त्यांच्या मनावर जे जाणीवपूर्वक संस्कार केले जातील त्यातूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. याच वयात भावी आयुष्यातील मोठेपणाचे बीजारोपण तयार केले जाते.

या वयोगटातील बालक हा प्रथमच कुटुंबातून शाळेत येत असतो. कुटुंबातील, आजुबाजूच्या सामाजिक वातावरणातील विविध संस्कार त्याच्यावर झालेले असतात. त्यातील योग्यायोग्यतेची निवड ही याच वयात केली जाते. त्यासाठी योग्य मूल्यांचा संस्कार, त्यांचे संवर्धन जाणीवपूर्वक करणे आवश्यक असते.

तसेच हाच त्याच्या भावी शिक्षणाचा, त्याच्या व्यक्तिमत्व - विकासाचा पाया असल्यामुळे आणि शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास अपेक्षित असल्याने त्याच्या व्यक्तिमत्वाची योग्य, सुसंस्कृत अशी जडणघडण करुन त्याचे जीवन संस्कारसमृध्द झाले तरच जीवनास योग्य अर्थ प्राप्त होऊ शकेल.

वेली वरील कळीला सूर्य किरणांनी पूर्णत्व येऊन तिचे फुल बनते व चहूकडे सुगंध दरवळतो. तसेच सुसंस्काराने माणसाचे माणूसपण जागृत होऊन तो ख-या अर्थाने माणूस म्हणूनच जगू शकतो. हे माणूसपण त्याच्यावर केल्या जाणा-या संस्कारातून लाभत असते. हे संस्कार घडतात आई-वडील, शिक्षक याद्वारे, म्हणजेच शिक्षण, संस्कृती व समाज यांतूनच सुसंस्कृत नागरिक निर्माण होतात. याच व्यक्ती आपला ठसा त्या संस्कृतीवर, समाजावर उमटवतात.

थोडक्यात व्यक्तीचे सुसंस्कृत व्यक्तिमत्व निर्माण करावयाचे असेल तर त्याच्यावर जाणीवपूर्वक संस्कार करणे आवश्यक आहे. हे संस्कार कोणते ? याचाच अर्थ कोणती मूल्ये संक्रमित करावयाची की जेणे करुन त्यांच्या व्यक्तिमत्वातून सुसंस्कृत नागरिक तयार होतील. यासाठी शिक्षकाला कोणत्या मूल्यांचे संस्कार करावयाचे हे माहिती असणे आवश्यक आहे.

शिक्षणाद्वारे व्यक्तिमत्व घडविण्याचे कार्य केले जावे अशी अपेक्षा आहे. " व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण " अशी शिक्षणाची व्याख्या केली जाते. या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू आहेत. तसेच आयुष्यात घडणा-या प्रत्येक घटना-प्रसंगातून त्याच्यावर संस्कार होत असतात. त्यामुळे येणा-या अनुभवांतील चांगले वाईटाची निवड त्यास करता आली पाहिजे. यासाठी व्यक्तीची निश्चित भूमिका असेल तरच तो या योग्यायोग्य अनुभवांची पारख करु शकेल. यासाठी किशोरवयात केले जाणारे संस्कार हे व्यक्तीची चिरकाल टिकणारी स्वभाव गुणवैशिष्टये निश्चित करणारे असतात. म्हणूनच या संशोधनासाठी अतिसंस्कारक्षम असा प्राथमिक स्तर निवडलेला आहे.

मातृभाषेचे स्थान जननी व जन्मभूमी यांच्या बरोबरीचे किंबहुना वरचे आहे· ती विचारांची जनक व वाहक असते· व्यक्तिमत्वविकासात, व्यक्तीचे भावनिक विश्व समृध्द करण्यात मातृभाषेचा वाटा फार मोठा असतो· व्यक्ती आपल्या विविध भावना मातृभाषेद्वाराच व्यक्त करते म्हणूनच कोलरिज म्हणतो की,

माणसामाणसातील हृदयसंवाद हा मातृभाषेतून चालतो· म्हणून मातृभाषेद्वारा व्यक्तीवर केले जाणारे संस्कार अधिक प्रभावी, परिणामकारक व दृढ होतात·

समाजातील सर्व क्षेत्रातील विचारवंत मूल्यांचा वाढता -हास व त्याच्या परिणामाने दूषित समाजजीवन पाहून चिंतित झाले आहेत· मूल्यांची ही अधोगती एक विघातक घटना आहे· यासाठी भूतकाळातील मागील अनुभवा-वरुन असे अपेक्षित आहे की, संलग्न परिणामकारक व जगण्यासारखी मूल्यपध्दती तर्कशुध्द, शास्त्रीय व नैतिक दृष्टीकोनावर आधारित असलेल्या शैक्षणिक कार्यक्रमा-द्वारेच समाजामध्ये रोवली जाईल·

स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या राष्ट्राने विविध क्षेत्रात प्रगतीची शिखरे गाठली आहेत· परंतु ही प्रगती होत असतानाच आपण कांही जीवनावश्यक मूल्ये हरवून बसलो आहोत· मूल्यांचा सर्व स्तरावरील होत असलेला -हास ही चिंतेची बाब झाली आहे· आज भावी पिढीवर नैतिक मूल्यांचा संस्कार होण्याची, करण्याची आवश्यकता त्यातूनच निर्माण झालेली आहे·

शिक्षण प्रक्रियेच्या विविध व्याख्या केल्या जातात त्या पैकीच एक व्याख्या अशी आहे, " व्यक्तीमध्ये इष्ट दिशेने परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय·" हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपण कांही उद्दिष्टे ठरवितो· त्या पैकीच एक उद्दिष्ट " व्यक्तीमध्ये मूल्यांचा संस्कार " घडविणे " हे आहे· त्यामुळे व्यक्तीवर विविध मूल्यांचे शिक्षणाद्वारे संस्कार

घडवून तिला संस्कारक्षम जीवन जगण्यासाठी कार्यक्षम बनविणे हे शिक्षणाचे आद्य कर्तव्य ठरते.

आजची शिक्षणपध्दती ही दिवसेंदिवस मूल्यसंवर्धनाचे व जोपासनेचे संदर्भात अपयशी होत आहे. त्यामुळे विचारवंत अस्वस्थ झालेले आहेत. शिक्षणातील विश्वासार्हता कमी होत चालली आहे. ही अस्वस्थता घालवून शैक्षणिक कार्याची घडी मूल्यसंवर्धनाचे संदर्भात योग्य करावयाची असेल तर इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांवर मातृभाषेतून जाणीवपूर्वक मूल्यसंस्कार करणे अगत्याचे आहे.

मूल्य ही संकल्पना व्यापक आहे. परंतु सर्वच मूल्य संक्रमणाचा विचार येथे अभिप्रेत धरलेला नाही. केवळ इयत्ता १ ली ते ४ थी च्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांच्या संक्रमणाचाच विचार येथे केलेला आहे. त्या साठी मराठी विषयाच्या अध्ययन अध्यापनापुरताच हा अभ्यास मर्यादित आहे.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनाची पुढील उद्दिष्टे आहेत.

(१) इयत्ता १ ली ते ४ थी या स्तरावरील मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून व्यक्त होणाऱ्या मूल्यांचा शोध घेणे.

(२) ही मूल्ये रुजवण्यासाठी संबंधित शिक्षक कोणते प्रयत्न करतात याचा अभ्यास करणे.

(३) ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होत नसतील तर त्या मागील कारणांचा शोध घेणे.

(४) ही मूल्ये अधिक चांगल्याप्रकारे संक्रमित होण्यासाठी कोणती उपाययोजना आणि शैक्षणिक उपक्रम हाती घ्यावयास पाहिजेत या विषयी

उपाययोजना सुचविणे.

## १.५ गृहित गोष्टी :

प्रस्तुत संशोधनात पुढील गोष्टी गृहित धरलेल्या आहेत.

(१) शिक्षण हे विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याचे महत्वाचे साधन आहे.

(२) मूल्य संस्कारामुळेच मानवी जीवनास खरा अर्थ प्राप्त होतो, सबब मानवी जीवनात मूल्यांचे स्थान सर्वप्रथम आहे.

(३) " मूल्य संस्कार " हे मातृभाषेच्या अध्यापनाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे.

## १.६ संशोधनाच्या मर्यादा :

या संशोधनाच्या मर्यादा खालीलप्रमाणे सांगता येतील.

(१) हे संशोधन इयत्ता १ ली ते ४ थीच्या प्रथम भाषा मराठी या विषयाच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनापुरतेच मर्यादित आहे.

(२) हे संशोधन कोल्हापूर शहरातील मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळांपुरतेच मर्यादित आहे.

## १.७ संशोधनाची पध्दती :

हे संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडित असल्याने सर्वेक्षणात्मक पध्दती वापरलेली आहे. या समस्येच्या संदर्भात सद्य:स्थिती कोणती आहे ? हे जाणून घेण्यासाठी ही संशोधन पध्दती उपयोगी आहे. या पध्दतीच्या आधारे मिळालेल्या व पाठ्यपुस्तकाचे विश्लेषणातून मिळालेल्या सामग्रीचे संकलन

वर्णन, स्पष्टीकरण व मूल्यांकन करुन चांगल्या बदलासाठी योग्य मार्गदर्शन केलेले आहे.

प्रस्तुत संशोधनाचे तीन भाग पडतात.

१. प्राथमिक स्तरावरील इयत्ता १ ली ते ४ थी च्या मराठीच्या पाठय-पुस्तकातून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचा शोध घेणे.

२. मराठीच्या पाठयपुस्तकातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये संक्रमित करतांना कोणकोणत्या अडचणी येतात त्याचे सर्वेक्षण करुन आढावा घेणे.

३. तिस-या विभागात अडचणीचे निराकरण करण्यासाठी शिफारशी करणे.

संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आलेला आहे. ही प्रश्नावली कोल्हापूर शहरातील महानगर-पालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळांतील इयत्ता १ ली ते ४ थी वर्गांना अध्यापन करणा-या अध्यापकांना देण्यात आली. प्राथमिक स्तरावरील इयत्ता १ ली ते ४ थी च्या वर्गांना अध्यापन करणा-या अध्यापकांसाठी दिलेली प्रश्नावली ( परिशिष्ट "अ" मध्ये ) दिली आहे.

प्रश्नावली मूल्यशिक्षण, मूल्य संक्रमण, मूल्यसंवर्धन व इयत्ता १ ली ते ४ थीच्या मराठीच्या पाठयपुस्तकातील पाठांतून प्रतित होणा-या मूल्यांच्या रुजवण्याच्या संदर्भात अध्यापक कोणकोणते प्रयत्न करतात, त्यामध्ये कोणकोणत्या अडचणी येतात यावर आधारित आहे. तसेच या प्रश्नावलीच्या आधारे मातृभाषेची पाठयपुस्तके, त्यामध्ये प्रतिबिंबित होणारी मूल्ये, मूल्य शिक्षण यांच्या संदर्भात अध्यापकांचे मनोगत, त्यांची मते, विचार व अपेक्षा यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या प्रश्नावलीत एकूण २६ प्रश्न होते. त्यातील कांही प्रश्न बंदिस्त स्वरुपाचे तर कांही मुक्त स्वरुपाचे होते. कांही प्रश्न संमिश्र स्वरुपाचे होते. संबंधित अध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण पुढील सारणी क्र.१.१ मध्ये

केलेले आहे·

सारणी क्रमांक १·१

प्रस्तुत संशोधनासाठी इयत्ता १ ली ते ४ थी च्या
अध्यापकांनी भरुन द्यावयाच्या प्रश्नावलीचे विश्लेषण

| अ·नं· | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरुप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १· | १ ते ६ | बंदिस्त | अध्यापकांची सर्वसाधारण माहिती· त्यांच्याशी पुन्हा संपर्क साधता यावा यासाठी विचारलेली आहे· |
| २· | ७ | बंदिस्त | पाठयपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली |
| | ८ | मुक्त | जातात काय ? जात असल्यास कशा |
| | ९ | संमिश्र | प्रकारे ? ती संक्रमित केली जात नसल्यास त्यामागील कारणे कोणती हे जाणून घेणे· |
| ३· | १० | बंदिस्त | मूल्य संक्रमणाचे प्रमाण जाणून घेणे आणि |
| | ११ | मुक्त | मूल्ये संक्रमित होत नसतील तर त्या मागील कारणांचा शोध घेणे व मूल्ये |
| | १२ | मुक्त | चांगल्या त-हेने संक्रमित करण्यासंबंधी उपाय जाणून घेणे· |
| ४· | १३ | बंदिस्त | मूल्ये संक्रमित होण्याच्या दृष्टिने अभ्यास |
| | १४ | मुक्त | पूरक कार्यक्रम योजतात काय ? योजत |
| | १५ | मुक्त | असल्यास असे कार्यक्रम व त्यातून बिंबवू इच्छित असलेली मूल्ये व या उपक्रमाखेरीज |

सारणी क्रमांक १·१ पुढे चालू ····

| अ·नं· | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरुप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| | | | आणखी कोणते उपक्रम शाळेत योजता येतील हे जाणून घेणे· |
| ५· | १६ | बंदिस्त | अध्यापकांचे मूल्यशिक्षणाचे संदर्भात एखादे कृतिसत्र/ शिबिर झाले आहे काय हे जाणून |
| | १७ | बंदिस्त | घेणे असल्यास त्याचे नांव, आयोजक, |
| | १८ | बंदिस्त | कालावधी देण्यात आलेले प्रशिक्षण व ते |
| | १९ | बंदिस्त | शिबिर अधिक परिणामकारक होण्याच्या |
| | २० | मुक्त | दृष्टीने ते कांही सूचना करत असतील |
| | २१ | मुक्त | तर त्या जाणून घेणे· |
| ६· | २२ | बंदिस्त | मूल्ये संक्रमित झाली आहेत की नाही |
| | २३ | मुक्त | याचे मूल्यमापन करावे काय ? नसल्यास कारणे जाणून घेणे व मूल्ये किती प्रमाणात |
| | २४ | बंदिस्त | रुजली आहेत याचे मूल्यमापन करता येईल |
| | २५ | मुक्त | काय व कशा प्रकारे करता येईल हे जाणून घेणे· |
| ७· | २६ | मुक्त | प्रस्तुत संशोधनास उपयुक्त माहिती जाणून घेणे· |

प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण करुन, वर्गीकरणाच्या योग्य मांडणीतून वस्तुस्थितीची स्पष्ट कल्पना आणलेली आहे· वस्तुस्थितीचा साकल्याने विचार करुन पाठयपुस्तकांच्या अध्यापनातून मूल्यसंवर्धन

या संदर्भात वस्तुस्थितीचे स्वरुप लक्षात घेतले गेले आहे. अपेक्षित बदलासाठी मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले गेलेले आहेत. या निष्कर्षाचा संघटितरित्या सूत्रबद्द विचार करुन समस्येच्या संदर्भात कोणती उपाययोजना करता येईल यासाठी शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

प्रश्नावली द्वारा मिळालेली माहिती पडताळण्यासाठी तिची यथार्थता व विश्वसनीयता आजमावण्यासाठी संशोधकाने प्राथमिक स्तरावर काम करणा-या वीस (२०) शिक्षकांच्या अनौपचारिक मुलाखती घेतल्या आहेत. ( पहा परिशिष्ट "क" )

तसेच इयत्ता १ ते ४ च्या १२ पाठांचे निरीक्षण केले. सदरचे निरीक्षण केले व घेतलेल्या मुलाखती, पाठाचा आशय, पाठांतून प्रतिबिंबित होणारी मूल्ये आणि ती मूल्ये विद्यार्थ्यात संक्रमित होण्यासाठी शिक्षकांनी केलेले प्रयत्न या मुद्दयांच्या संदर्भात आहेत. ( पहा परिशिष्ट " ड " )

१.८ <u>प्रकरणीकरण</u> :

संशोधनामध्ये वापरलेली पद्दती तसेच प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या सामग्रीचे वर्गीकरण व पृथ:करण करुन त्यांचे अन्वयार्थ लावून व त्या अनुरोधाने काढलेले निष्कर्ष, शिफारशी पुढील प्रकरणातून मांडलेल्या आहेत.

<u>प्रकरण -१</u> : " विषय प्रवेश "

प्रस्तुत प्रकरणात ही समस्या कशी निर्माण झाली याचा शोध घेऊन समस्येचे शब्दांकन केलेले आहे. तसेच समस्येचे महत्व, गरज, समस्येच्या मर्यादा, उद्दिष्टे, गृहित गोष्टी आणि या समस्येसाठी कोणती संशोधन पद्दती उपयोजिण्यात आली याचा निर्देश करण्यात आलेला आहे.

प्रकरण - २ : " मूल्य - अर्थ, महत्व व अध्यापन "

प्रस्तुत प्रकरणात मूल्य म्हणजे काय ? त्याचे मानवी जीवनातील स्थान, मूल्ये रुजवावयाचीत, बिंबवावयाचीत म्हणजे काय करावयाचे ? मूल्य रुजवण्यासंबंधी शिक्षकाची भूमिका कोणती ? मूल्यांची अध्यापन पध्दती इत्यादी गोष्टींचा ऊहापोह करण्यात आलेला आहे.

प्रकरण - ३ : " इयत्ता १ ते ४ च्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठां-मधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचे विश्लेषण "

या प्रकरणात इयत्ता १ ली ते ४ थी च्या मराठी विषयाच्या पाठ्य-पुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचा शोध घेऊन ती निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच त्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

प्रकरण - ४ : " संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन "

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनासाठी निवडलेल्या विषयाशी संबंधित साहित्य व संशोधन यांचे समालोचन केलेले आहे.

प्रकरण - ५ : " संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन "

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रश्नावलीद्वारे गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण विश्लेषण करुन या विश्लेषणावर आधारित अन्वयार्थ लावण्यात आलेला आहे.

प्रकरण - ६ : " निष्कर्ष आणि शिफारशी "

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन सामग्रीच्या आधारे समस्येच्या वस्तुस्थितीचे निश्चितीकरण करण्यात आलेले आहे. त्यातून निष्कर्ष काढलेले आहेत. काढलेल्या निष्कर्षाच्या आधारे शिफारशींचा निर्देश करण्यात आलेला आहे, निश्चित अशी उपाययोजना सुचविण्यात आलेली आहे. तसेच प्रस्तुत संशोधनाविषयाची प्रत्यक्षपणे

निगडित नसलेल्या तथापि प्रस्तुत समस्येचे सम्यक् आकलन होण्याच्यादृष्टीने उपयुक्त ठरणा-या कांही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश करण्यात आलेला आहे.

=0=0=0=0=0=

सं द र्भ :


१· कुंडले, म· बा· : शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पाचवी आवृत्ती, १९८३ ( पुणे - श्री विद्या प्रकाशन, ) पृ· ५६·

२· Radhakrishnan (Chairman): University Education Commission Report, 1948-49, Volume I (Simla : Government of India Press, August 1949), P. 300.

३· डॉ·कोठारी,डी·एस्· : शिक्षण आयोग अहवाल (शिक्षण आणि राष्ट्रीय विकास), १९६४-६६ ( नवी दिल्ली - शिक्षण मंत्रालय,भारत सरकार ), पृष्ठ ११·

४· राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६, शैक्षणिक आव्हानाकडून कृती कार्यक्रमांकडे, ( पुणे - संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ), पृष्ठ १४४·

५· कुंडले, म·बा· : शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पाचवी आवृत्ती, १९८३ ( पुणे : विद्या प्रकाशन ), पृष्ठ ५०९

६· कुंडले, म·बा· : शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पाचवी आवृत्ती, १९६३, ( पुणे - विद्या प्रकाशन ), पृ· ५१०·

७· अकोलकर, ग·वि· व पाटणकर, ना·वि· : मराठीचे अध्यापन, सातवी आवृत्ती, ( पुणे - व्हीनस प्रकाशन,१९७० ), पृष्ठ ५०·

८· कुंडले, म·बा· : मराठीचे अध्यापन, द्वितीय आवृत्ती,१९८५ (पुणे - श्री· विद्या प्रकाशन ), पृ· ५६·

९· पाटील, लीला : मराठीचे अध्यापन व मूल्यमापन, १९७८ ( पुणे - व्हीनस प्रकाशन ) पृष्ठ - १२-१३ ·

10. G. Terry Page and Thomas J.B. with Marshall A.R.: Inter National Dictionary of Education, Reprint. (London : Kogan Page Ltd., 1978), p. 342.

11. Sykes J.B. : The Concise Oxford Dictionary of Current English, Seventh Edition (Bombay : Oxford University Press, 1987), p. 1107.

12. G. Terry Page and Thomas J.B. with Marshall A.R. : International Dictionary of Education, reprint. (London : Kogan Page Limited., 1979), p. 357.